नि.दि.दा.क्र.१९८/२०२१
नि.क्र.४४ व ४५

<u>उलटतपास सर्व प्रतिवादींकरीता विधीज्ञ श्री. जी.जी. पारखे यांच्यावतीने शपथेवर सुरु</u> -

१. सरतपासाचे शपथपत्र मी स्वतःकरीता व इतर वादींकरीता देखील दाखल केले आहे. वादी क्र.२ ते ४ यांनी त्याकरीता माझ्या हक्कात मुखत्यारपत्र करुन दिलेले नाही. मी व वादी क्र.२ एकत्रात राहतो. माझे वडील सन २०१९ मध्ये मयत झाले. प्रतिवादींना मी जेव्हापासून मला कळते तेव्हापासून ओळखतो. माझी जन्मतारीख १०/१०/१९७५ अशी आहे. माझे शिक्षण इयत्ता ८ वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीच्या दक्षिणेला आमची वडिलोपार्जित गट क्र.१५४ ही जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५४ आणि गट क्र.१५५ या जमिनीमध्ये पूर्व-पश्चिम बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१५५ ही गट क्र.१५४ च्या उत्तरेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१५४ या जमिनीमध्ये आमची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१५४ या जमिनीमध्ये विहीर आहे व त्यावर विद्युत मोटार आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीमध्ये विहीर व बोअर नाही.

<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.28 15:24:36 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २८/११/२०२५